# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक ३१/०८/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि.मी अंतरावरील कांद्री वार्ड क्र. १ कन्हान येथे दिनांक २८/०८/२०२२ चे २२.४५ वा ते २३.०० वा. दरम्यान आरोपी १) अमन खान, २) अमन पप्पु कैथवास, वय २० वर्ष, ३) ईरफान मकबुल शेख, वय २३ वर्ष, ४) अमीत भारत तपसवी, वय १८ वर्ष, ५) संजय उर्फ सोनु श्यामलाल गुप्ता, वय १९ वर्ष ६) संदीप नरेश धुर्वे, वय १८ वर्ष, सर्व रा. हरीहर नगर, कांद्री कन्हान यांनी संगणमत करुन गैरकायद्याची मंडळी तयार करुन लाठी काठया घेवुन जुण्या भांडणाच्या कारणावरुन फिर्यादी/पीडित महिला वय ३२ वर्ष यांचे घरावर हमला घेवुन आले. फिर्यादीचे पती घराबाहेर अंगणात बसले असता तीच्या पतीला 'तु ज्यादा बडा बदमाश हो गया है' असे म्हणुन आ. क्र. १ हा मारण्यास धावला असता फिर्यादी व तिचे पती यांनी घरात जावुन फिर्यादी ही दार बंद करित असतांना यातील आ. क्र. १ व त्याच्या साथीदारांनी फिर्यादीचा विनयभंग करुन अश्लिल शिवीगाळ करुन जिवानीशी मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचा दार व मोटरसायकल ची तोडफोड करुन नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३,१४७,१४८,१४९,३५४ब,२९४,५०६,४२७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलझेले मो.न. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक ०१/०४/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक २८/०८/२०२२ चे २३.०० वा. चे सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी पीडिता वय १६ वर्ष हिचे अज्ञात आरोपीने अल्पवयाचा फायदा घेत अज्ञात ठिकाणी तिचेवर वारंवार शारीरिक संबंध प्रस्तापीत केले. त्यामुळे पीडिता हि पावणे पाच महिण्याची गर्भवती राहली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(एन), ३७६(२)(जे), ३७६(३) भादवी, सहकलम ४, ५(जे)(२), ५(एल), ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि प्रियंका गेडाम मो.नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत नॅशनल हायवे क्र. ५३ ठाकरे बंधु ढाबा समोर येथे दिनांक ३९/०८/२२ चे २०.३० वा. ते २०.४५ वा. सुमारास **फाल्गुनी अर्जन बघेल (मृतक), वय ४१ वर्ष, रा. ग्राम उडीयापाल ता. कोरटा जि. बस्तर छत्तीसगड ह.मु महालगाव** हा ठाकरे बंधु ढाबा समोरील नॅशनल हायवे नागपुर ते भंडारा रोड पायदळ क्रॉस करते वेळी अज्ञात ट्रक चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक मारून त्याचे मरणास कारणीभुत ठरला व पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— देवचंद वासुदेव ठाकरे, वय ३७ वर्ष, रा. ठाकरे बंधु ढाबा महालगाव यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बिरोले मो.क्र. ९५५२५१३५९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**